# जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुं.क.सोसायटी
# राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा यवतमाळ
## जिल्हास्तर गटप्रवर्तक पदाकरीता जाहीरात

राष्ट्रीय आरोग्य अभियान यवतमाळ अतर्गत जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी व्दारे जिल्हास्तर गटप्रवर्तक (आशा योजना) यापदाकरीता कामावर आधारीत मोबदला पध्दतीने ईच्छुक उमेदवारावकडुन अर्ज दि.०५/१२/२०२३ ते दि.१३/१२/२०२३ या कालावधी मध्ये सकाळी १०.०० ते ५.३० वेळेत जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, जि.प. यवतमाळ या कार्यालयात प्रत्यक्ष किंवा पोस्टाव्दारे मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | शैक्षणीक अर्हता | वयोमर्यादा | विवरण | भत्ता | प्रतिमाह कामावर आधारीत मोबदला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हास्तर गटप्रवर्तक ( आशा योजना) | १ | १) किमाण पदवीधर असणे आवश्यक.<br>२) उच्च शैक्षणीक पात्रता धारकास प्राधान्य.<br>३) संगणक ज्ञान -एम.एस.सी.आय.टी उत्तिर्ण<br>४) टायपिंग-मराठी (३०) व ईंग्रजी (४०)असणे आवश्यक.<br>५) अनुभव MS Word or MS Excel चे काम केल्याचा अनुभव.<br>६) सदर पद महीला उमेदवारास राखीव राहील. | वय २१ ते ३८ | किमान २५ दिवस कार्यालयीन कामकाज | रु.३००/- याप्रमाणे २५ दिवसाकरीता | रु.८६००/- |

**अटी व शर्ती :-**

१) सदर पदे राज्य शासनाची पदे नसुन कामावर आधारीत मोबदला स्वरुपातील पदे आहेत.

२) नमुद पदे सन २०२२-२३ च्या मंजुर पीआयपी च्या अधिनस्त राहुन तसेच पदांची संख्या व भरतीबाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष निवड समिती यांचे स्तरावर राखुन ठेवण्यात येत आहे.

३) पदांसाठीचा कामावर आधारीत मोबदला हे एकत्रित आहे. सदर पदांच्या संख्येत व मानधनात तसेच पदस्थापनेत बदल होऊ शकतो.

४) शैक्षणीक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे १) अंतीम वर्षाची गुणपत्रीका ३) पदवी प्रमाणपत्र ४) शाळा सोडल्याचा दाखला/ जन्मतारखेचा दाखला ५) अनुभवाची प्रमाणपत्रे , सोबत जोडण्यात येणारे सर्व कागदपत्रे साक्षांकित असावे. ( शासकिय किंवा निमशासकिय संस्थेत केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र)

५) अलीकडचा पासपोर्ट साईजचे १ फोटो व स्वतःचा ई-मेल व दुरध्वनी क्रमांक

उमेदवारांनी अर्जासोबत सर्व सत्यप्रती जोडुन जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.यवतमाळ या कार्यालयाच्या ठिकाणी मा. अध्यक्ष निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.यवतमाळ यांचे नावाने सादर करावा.

६) उच्च शैक्षणीक अर्हता धारकांस व अनुभव असलेल्या उमेदवारांस प्राधान्य दिले जाईल.

७) प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार मुलाखत अथवा कौशल्यचाचणी घेण्यात येईल. सदर बाबतचे तसेच अंतर्गत बाबतींत बदल करण्याचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखुन ठेवण्यात येईल.

८) उमेदवारे अर्ज सादर करतेवेंळी अर्ज सादर करतांनाचे दिनांकाचे वेळी उमेदवाराचे वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. (जाहीरात प्रसिध्दीच्या दिवशी)

९) **गुणांकन पद्धती -** निवड प्रक्रीया ही खालील प्रमाणे राबविण्यात येईल ( निवड प्रक्रिया ही १०० गुणांची राहील)

| विवरण | तपशील | अधितम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying Exam मधील गुण ( अंतिम वर्षाच्या गुणाच्या अधारे) | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे ५०% प्रमाणे Proportion काढुन ( Qualifying Exam मध्ये ६० % गुण प्राप्त असल्यास त्याचं ५० प्रमाणे Proportion =60*50/100=30 गुण | ५० गुण |
| शैक्षणिक अर्हतापेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास | अधितम २० गुण देण्यात येईल ( ६० % गुण प्राप्त असल्यास त्यांच २० % प्रमाणे Proportion = 60*20/100=12) | २० गुण |
| पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण देण्यात येईल ( १ वर्षा करीता जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | १०० गुण |

➢ सदरील गुणानुक्रमानुसार निवड करतांना उमेदवाराची गुणांकन यादी तयार करण्यात येईल त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येईल. नियुक्ती आदेश दिलेल्या नंतर उमेदवारांची रुजु करुन घेण्यापुर्वी सर्व आवश्यक मुळ कागदपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे आणि इतरं आवश्यक कागदपत्रे यांची तपासणी जिल्हास्तरावर करण्यात येईल.

वरील पदभरती प्रक्रिये संबंधित संपुर्ण अद्यावत यादी व माहिती व निर्देश वेळोवेळी अद्यावत सुचना www.zpyavatmal.gov.in, या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

१०) निवड झालेल्या उमेदवारास सुरुवातीला नियुक्ती हि ३१/०३/२०२४ पर्यंत राहील.

११) टायपिंग- मराठी ( ३०)व ईंग्रजी (४०)टायपिंग असणे आवश्यक.

१२) अनुभव- MS word or MS excel चे काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य

१३) सदर पद महिला उमेदवारास राखीव राहील.

१४) **प्रतिज्ञापत्र नमुना अ** लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

१५) उशिरा आलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.(व्यक्तीशा किंवा टपालाव्दारे येणारे)
१६) अर्जदाराने अर्ज जाहीराती सोबत देण्यात आलेल्या अर्ज नमुन्यात नुसार अर्ज करावा.
१७) एकापेक्षा जास्त ठिकाणी कार्यरत असल्यास उमेदवारानं अर्ज करण्यात येवु नये. निवड उपरांत तत्सम बाब कार्यालयाच्या निदर्शनास अल्यास नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
१८) काही अपरिहार्य कारणामुळे जिल्हास्तरावरील गटप्रवर्तकांच्या पदस्थापनेत बदल होवु शकतो त्यांना प्रत्यक्ष जावुन आशा स्वयंसेविका गटप्रवर्तक म्हणुन काम करावे लागु शकते.
१९) भरती प्रक्रीयेला स्थगिती देणे/रद्द करणे/ पदभरती प्रक्रीयेत बदल करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यवतमाळ यांच्या स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.
२०) संपुर्ण निवडप्रक्रिया ही गुणवत्तेवर आधारीत पारदर्शी पद्धतीने घेण्यात येईल.

**टिप :** सदर अर्ज जाहीरात प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून जाहीरातीत नमूद केलेल्या तारखेपर्यंतच स्विकारण्यात येतील. उशिरा आलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही तसेच अर्ज कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) स्विकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.

सदस्य सचिव
जिल्हा एकात्मिक आरोग्य
व कुटूंब कल्याण सोसायटी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, यवतमाळ

अध्यक्ष
जिल्हा एकात्मिक आरोग्य
व कुटूंब कल्याण सोसायटी तथा
मुख्य कार्यकारी अधिकरी
जिल्हा परिषद, यवतमाळ

# अर्ज नमुना

| | |
|---|---|
| अर्ज क्रमांक | |
| दिनांक | |

प्रति,
मा. जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, यवतमाळ

विषय :- .................................................पदासाठी अर्ज सादर करण्याबाबत

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उमेदवराचे संपूर्ण नाव | अडनाव | | | पहिले नाव | | | मधले नाव | |
| | | | | | | | | | |
| | लग्ना नंतरचे संपुर्ण नाव | | | | | | | | |
| २ | पत्रव्यावहाराचा कायमचा संपूर्ण पत्ता | ..........................................<br>..........................................<br>तालुका .................... जिल्हा ....................<br>पिन कोड | | | | | | | |
| ३ | ई-मेल | | | | भमणध्वनी क्र | | | | |
| ४ | जात | | | | पोटजात | | | | |
| ५ | अर्जाचा प्रवर्ग वर्गवारी ( ) | | | | | | | | |
| | अजा | अ.ज | वि.जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ.ज. (ड) | वि.मा. प्र | इ.माव | खुला |
| | | | | | | | | | |
| ६ | जन्मतारीख (अंकात) | | | | | | | | |
| ७ | | वर्ष | | | महिने | | दिवस | | |

| ८ | | | अर्जदाराची शैक्षणीक पात्रत (उत्तीर्ण परीक्षेचा तपशील) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | परिक्षेचे नाव | संस्थेचे नाव | एकुण गुण | प्राप्त गुण | प्राप्त गुणाची टक्केवारी | उत्तीर्ण झालेले वर्ष |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |

| ९ | कामाचा अनुभव असल्यांस त्याबाबत माहिती (Govt./Semi Govt./Local Self Gov./NRHM) | |
|---|---|---|
| | कार्यालयाचे नाव व पत्ता :- | |
| | पदाचे नाव :- | |
| | कालावधी :- | |
| | सध्या कार्यरत आहे का (होय / नाही) | |

मी.................................................... असे प्रमाणित करतो/करते कि मी जाहिरात योग्य रीतीने वाचली असुन मी ......................... या पदाकरिता अर्ज सादर केला आहे. मला जाहिराती मध्ये अटी व शर्ती मान्य आहेत. मी नमुद केलेली माहिती कोणत्याही टप्प्यावर चुकीची अगर खोटी आढळून आल्यास माझी उमेदवारी कोणत्याही टप्यावर रदद करण्यात येईल व माझा पदावर कोणताही हक्क राहणार नाही याची मला जाणीव आहे. तसेच या संदर्भात नियुक्ती अधिकारी जो निर्णय देतील ती मला मान्य राहील व होणाऱ्या कार्यवाहीस मी पात्र राहील आणि भरती बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

स्थळ :-
दिनांक :-